# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ५२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि.३१ ऑगस्ट, २०१३ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ५३ वी बैठक शनिवार, दि.३१ ऑगस्ट, २०१३ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | विभागीय सहसंचालिका, सोलापूर विभाग | सदस्या |
| ३) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ६) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ७) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ८) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १०) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| ११) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १२) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १३) | श्री. रोकडे एम. एस. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १४) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

### स्वागतः

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. श्री. एस. के. माळी कुलसचिव यांनी दि.११/०७/२०१३ रोजी कुलसचिव पदाचा पदभार स्विकारल्यानंतर व्यवस्थापन परिषदेची ही पहिलीच बैठक असल्याने श्री. बी. आर. गायकवाड व ॲड. श्री. बी. एस. सलगर, व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

### अनुपस्थिती:

सौ. पद्मजादेवी मोहिते-पाटील यांनी पत्राद्वारे, प्रा. डॉ. पाटील टी. आर. व डॉ. श्रीमती एस. आर. याजमान्य यांनी दूरध्वनीद्वारे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित राहणार असल्याचे कळविले. यांच्या अनुपस्थितीची बैठकीत नोंद घेण्यात आली.

### कामकाजपत्रकातील दोष दुरुस्ती :

कामकाजपत्रकामध्ये पाठविण्यात आलेला विषय क्र.०३ विद्या परिषदेचा विषय असल्याने सदरचा विषय रद्द करण्यात आल्याचे सदस्यांना पत्र जा. क्र. सोविसो/सनिवि/३७५४, दि.२८/०८/२०१३ अन्वये कळविण्यात आले आहे.

**सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ]** **दि.२६ जून, २०१३ रोजीच्या ५२ व्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव :** **दि.२६ जून, २०१३ रोजीच्या ५२ व्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची बैठकीत नोंद घेण्यात आली.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठरावः**

**१) महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**२) मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल कामकाजपत्रकासोबत विद्यापीठ प्रशासकीय विभागनिहाय देण्यात यावा त्याच प्रमाणे सदर अहवालात विविध घटनांचा अंतर्भाव असावा असे ठरले.**

## [ ०४ ] तक्रार निवारण समितीवरील रिक्त झालेल्या पदांवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: शै. वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ करीता म. वि. कायदा १९९४ कलम ५७(३) अन्वये तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आलेली आहे. व्यवस्थापन परिषदेतून खालीलप्रमाणे समिती सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले होते.

| | | |
|---|---|---|
| व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशन | Maharashtra University Act 1994 Section 57 (3) (a), (b)<br>(a) Pro-Vice-Chancellor, where there is no Pro-Vice-Chancellor, a member of the Management Council nominated by the Management Council.......Chairman | प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे<br>संतोष भिमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप,<br>ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| | (b) (Two) members of the Management Council nominated by the Management Council from amongst themselves ........Member | प्रा.डॉ. लोणीकर एस. व्ही.<br>संचालक,<br>स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस, सोविसो |
| | (One of them belonging to the Scheduled Castes or Scheduled Tribes of De-notified Tribes (Vimukta Jatis) / Nomadic Tribes or Other Backward Classes, by rotation)............Member | प्राचार्य डॉ. गणगे के. एन.<br>कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर,<br>ता. पंढरपूर, जि. सोलापूर. |

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ५७ नुसार गठीत करण्यात आलेल्या तक्रार निवारण समितीवरील रिक्त झालेल्या पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | रिक्त पदाचा संवर्ग | पद रिक्त झालेल्या समिती सदस्याचे नाव | पद रिकत असण्याचे / झाल्याचे कारण |
|---|---|---|---|
| १) | Maharashtra Univeristy Act 1994 Section 57(3)<br>(a), (b)<br>(a) Pro-Vice-Chancellore, where there is no Pro-<br>Vice-Chancellor, a member of the Management Council nominated by the Management Council ....Chairman | प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे | प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे, अध्यक्ष तक्रार निवारण समिती यांची दोन वर्षाच्या कालावधीसाठी प्रस्तुत विद्यापीठाच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या संचालकपदी नियुक्ती झाल्याने |
| २) | (b) (Two) members of the Management Council nominated by the Management Council from amongst themselves.<br>One of them belonging to the Scheduled Castes or Scheduled Tribes or De-notified Tribes (Vimukta Jatis) / Nomadic Ttibes or Other Backward Classes, by rotation) Member | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर | प्राचार्य डॉ. के. एन. गणगे हे कार्यरत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथे प्राचार्यपदी कार्यरत होते. ते नियत वयोमानानुसार दि.३०/०६/२०१३ रोजी सेवा निवृत्त झाल्याने |

सबब, रिक्त झालेल्या पदावर व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशन होवून मिळण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: तक्रार निवारण समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले.**

| नामनिर्देशित सदस्याचे नाव | पदनाम | सूचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| **प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर** | अध्यक्ष | **व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांकडून सर्वानुमते ठरले** | |
| **डॉ. टी. एन. शिळीमकर (खुल्या प्रवर्गातून)**<br>**डॉ. एस. व्ही. लोणीकर यांचे अध्यक्ष पदी नामनिर्देशन केल्याने)** | **सदस्य** | **डॉ. एस. डी. कदम** | **डॉ. ए. ए. शेख** |
| **ॲड. श्री. बी. एस. सलगर (राखीव प्रवर्गातून)** | **सदस्य** | **डॉ. एस. एस. सूर्यवंशी** | **श्री. बी. आर. गायकवाड** |

**[ ०५ ] महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीवरील रिक्त झालेल्या पदांवर व्यवस्थापन परिषद सदस्यांकडून नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: शै. वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ करीता म.वि.कायदा १९९४ कलम ३५ महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समिती गठित करण्यात आलेली आहे. व्यवस्थापन परिषदेतून खालील प्रमाणे समिती सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले होते.

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ३५ (२) नुसार महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीवरील रिक्त पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशन | 35 (2) (g) One principal of an affiliated college of arts, science or commerce, nominated by the Management Council from amongst the principals who are members of the Academic Council. | सदस्य<br>प्राचार्य डॉ.के.एन.गणगे,<br>कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,<br>ता. पंढरपूर, जि.सोलापूर |

उपरोक्त प्रमाणे गठित केलेल्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीवरील पद रिक्त झालेली आहेत रिक्त पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | रिक्त पदाचा संवर्ग | रिक्त पदांची संख्या | पद रिक्त झालेल्या समिती सदस्याचे नाव | पद रिक्त असण्याचे / झाल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १) | 35 (2) (g) One principal of an affiliated college of arts, science or commerce, nominated by the Management Council from amongst the principals who are members of the Academic Council. | ०१ | प्राचार्य डॉ.के.एन.गणगे, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय ता.पंढरपूर, जि.सोलापूर | प्राचार्य डॉ.के.एन.गणगे हे कार्यरत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथे प्राचार्यपदी कार्यरत होते. ते नियत वयोमानानुसार दि.३०.०६.२०१३ रोजी सेवा निवृत्त झाले आहेत. |

सबब, रिक्त झालेल्या पदावर व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशन होवून मिळण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीवर व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशन खालीलप्रमाणे करण्यात आले.**

| नामनिर्देशित सदस्याचे नाव | पदनाम | सूचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| **प्राचार्य डॉ. जी. एन. चिट्टे** | **सदस्य** | **प्राचार्य श्री. एस. के. पवार** | **डॉ. टी. एन. शिळीमकर** |

**[ ०६ ] श्री. तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वेताळवाडी, ता.माढा संचलित एल. पी. एस. मास्टर ऑफ एज्युकेशन, माढा या महाविद्यालयाच्या नावात शिक्षणशास्त्र महाविद्यालय एम. एड., माढा असा बदल करण्यास व सदर नावातील बदल करण्यासंदर्भात प्रस्तुत विद्यापीठाचे एन. सी. टी. ई., भोपाळ यांचे नियमावलीनुसार ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: मा. सचिव, श्री. तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वेताळवाडी, ता. माढा यांच्याकडून संचलित एल.पी.एस मास्टर ऑफ एज्युकेशन, माढा या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

श्री. तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वेताळवाडी ता.माढा या संस्थेच्या संचलित एल.पी.एस. मास्टर ऑफ एज्युकेशन, माढा. या नावाने या महाविद्यालयास शै. वर्ष २००९-१० मध्ये मान्यता मिळालेली आहे.

मा.सचिव, श्री. तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वेताळवाडी यांनी प्रस्तुत अर्जासोबत दि.१०/०३/२०१३ रोजीच्या संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सभेतील महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबतचा ठराव जोडलेला आहे. सदर अर्जात बी. एड. महाविद्यालयाशी एम.एड. हा पदव्युत्तर विभाग संलग्न आहे. दोन्ही महाविद्यालये एकाच विद्याशाखेची असून एकाच इमारतीत भरतात. दोन वेगळी नावे असल्याने तांत्रिक व प्रशासकीय अडचणी येत असल्याचे कारणे नमुद केलेली असून महाविद्यालयाच्या नावात जून २०१३ पासून खालीलप्रमाणे बदल करुन मिळण्याविषयी विनंती केलेली आहे.

| महाविद्यालयाचे सद्य:स्थितीतील नांव | महाविद्यालयाच्या नावातील बदल |
|---|---|
| एल.पी.एस. मास्टर ऑफ एज्युकेशन, माढा. | **शिक्षणशास्त्र महाविद्यालय एम .एड., माढा.** |

उक्तप्रमाणे महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याचा प्राप्त प्रस्तावास प्रथम महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर संस्थेच्या संचलित महाविद्यालयास एन.सी.टी.ई. व शासनाची मान्यता मिळाल्यानंतर उपरोक्तप्रमाणे महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यास मान्यता देता येईल. तथापि, सदरकामी व्यवस्थापन परिषद मान्यतेनंतर संस्थेस संचलित महाविद्यालयाच्या नावातील बदला संदर्भात कार्यवाही करण्यास्तव एन.सी.टी.ई., भोपाळ यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

सदर बाब दि.२०/०७/२०१३ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या

सभेत विचारार्थ सादर केली असता, ठराव क्र.०४ अन्वये श्री. तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वेताळवाडी. ता.माढा संचलित एल.पी.एस. मास्टर ऑफ एज्युकेशन, माढा या महाविद्यालयाच्या नावात शिक्षणशास्त्र महाविद्यालय एम.एड., माढा असा बदल करण्यास व सदर नावातील बदल करण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेस प्रस्तुत विद्यापीठाचे एन.सी.टी.ई., भोपाळ यांचे नियमावलीनुसार ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.

सबब, श्री. तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वेताळवाडी. ता. माढा संचलित एल.पी.एस. मास्टर ऑफ एज्युकेशन, माढा या महाविद्यालयाच्या नावात शिक्षणशास्त्र महाविद्यालय एम.एड., माढा असा बदल करण्यास व सदर नावातील बदल करण्यासंदर्भात प्रस्तुत विद्यापीठाचे एन.सी.टी.ई., भोपाळ यांचे नियमावलीनुसार ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव:** अ) **श्री. तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वेताळवाडी, ता. माढा संचलित एल. पी. एस. मास्टर ऑफ एज्युकेशन, माढा या महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबतच्या प्रस्तावावर महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

| जुने नाव | नवीन नाव |
|---|---|
| **श्री. तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वेताळवाडी, ता. माढा संचलित एल. पी. एस. मास्टर ऑफ एज्युकेशन, माढा** | **श्री. तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वेताळवाडी, ता. माढा संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय एम. एड., माढा** |

ब) **प्रस्तुत विद्यापीठाचे एन. सी. टी. ई. भोपाळ यांच्या नियमावलीनुसार ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ] शै.वर्ष २०१४-१५ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरीता महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने तयार केलेला शै. वर्ष २०१४-१५ या एका वर्षाचा बृहत आराखडा विचारार्थ.**

(टिपणी: महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने दि.२०/०७/२०१३ रोजीच्या बैठकीत ठराव क्रं २ अन्वये शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ या पाच वर्षीय दिर्घकालीन बृहत आराखडयास व प्राप्त निवेदनास अनुसरुन शै. वर्ष २०१४-१५ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी शै.वर्ष सन २०१४-१५ या एका वर्षाचा शैक्षणिक बृहत आराखडा खालील प्रमाणे तयार करुन व्यवस्थापन परिषदेला शिफारस करण्यात आलेला आहे.

**आवश्यकतेनुसार विद्यापीठ परिसरात अनुदानित तत्वावर नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याचा अधिकार मा. कुलगुरु महोदय यांना देण्यात आला.**

| अ. क्र. | बृहत आराखड्यातील ठिकाण | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १ | **सोलापूर शहर** | मास्टर ऑफ सायबर लॉ ॲन्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी,<br>मास्टर ऑफ जरनॅलिझम ॲन्ड मास कॅम्युनिकेशन<br>बी.एस्सी रिनिवेबल एनर्जी,<br>बॅचलर कोर्स इन खादी प्रोडक्शन ॲन्ड डिझाईन,<br>बॅचलर ऑफ जरनॅलिझम ॲन्ड मास कम्युनिकेशन,<br>कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी |
| २ | **दक्षिण सोलापूर** | |
| | **वळसंग** | कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| | **बोरामणी** | कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| | **आहेरवाडी** | कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| ३ | **अक्कलकोट** | |
| | **दुधनी** | कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| | **चपळंगाव** | कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| ४ | **बार्शी** | |
| | **मालवंडी** | कॉलेज ऑफ आर्टस |
| ५ | **मोहोळ** | |
| | **कुरुल** | कॉलेज ऑफ आर्टस |
| ६ | **मंगळवेढा** | |
| | **पाटखळ** | कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स |
| | **मरवडे** | कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| ७ | **सांगोला** | |
| | **सांगोला** | बॅचलर ऑफ डिझाईन |
| | **महूद** | कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स |

| | | |
|---|---|---|
| ८ | **माडा** | |
| | **माढा** | कॉलेज ऑफ सायन्स |
| | **मोडनिंब** | कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| | **टेंभुर्णी** | बॅचलर ऑफ लायब्ररी ॲन्ड इन्फॉर्मेशन सायन्स (B.Lib.ISc) |
| ९ | **करमाळा** | |
| | **करमाळा / झरे** | बी. एस्सी एनव्हारमेंटल सायन्स |
| | **करमाळा** | बॅचलर ऑफ लायब्ररी ॲन्ड इन्फॉर्मेशन सायन्स (B.Lib. ISc) |
| | **भिलारवाडी / जिंती** | कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| १० | **माळशिरस** | |
| | **माळी नगर** | कॉलेज ऑफ आर्टस कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| | **पिलीव** | कॉलेज ऑफ आर्टस कॉमर्स ॲन्ड सायन्स |
| | **नातेपुते** | कॉलेज ऑफ कॉमर्स |
| ११ | **पंढरपूर** | |
| | **पंढरपूर** | कॉलेज ऑफ संत वांग्डमय |
| | | कॉलेज ऑफ म्युजिक |
| | | कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी |

शै. वर्ष २०१४-१५ साठी मान्यता प्राप्त संस्था / संलग्नित महाविद्यालयांकडून बी.बी.ए, बी.सी.ए. व बी.एस्सी (ई.सी.एस), शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र, व समाजकार्य (बी.एस.डब्लु व एम.एस.डब्लु), इंजिनिअरींग, फार्मसी, एम.बी.ए, बायोटेक्नॉलॉजी व एम.सी.ए. या अभ्यासक्रमाचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

सबब, शै. वर्ष २०१४-१५ या एका वर्षासाठी महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ सभेने उपरोक्तप्रमाणे तयार केलेला शैक्षणिक बृहत आराखडा विद्या परिषदेस शिफारस करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ८२ (१) नुसार, शै.वर्ष २०१४-१५ या वर्षासाठी महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने अद्यावत केलेल्या बृहत आराखड्याची शिफारस स्विकारुन विद्या परिषदेस शिफारस करण्यात आली.**

**[ ०८ ] शास्त्रीय उपकरण केंद्रातील विविध उपकरणे खरेदीचे वेळी मागविण्यात आलेल्या निविदासोबतचे रु. दहा हजार इतक्या रकमेचे धनाकर्षांची मुदत संपल्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: या विद्यापीठासाठी शास्त्रीय उपकरणे खरेदीसाठी शासनाकडून रु.२.७८ कोटी इतके अनुदान शासनाकडून प्राप्त झाले होते. तसेच सदर रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत शासनाकडून वारंवार कळविण्यात येत होते. त्यामुळे सदरील उपकरणांची सत्वर खरेदी करणे आवश्यक असल्यामुळे तत्कालीन मा.कुलगुरुमहोदयांनी सदरील उपकरणांच्या खरेदीसाठी निविदा मागवून सत्वर प्रक्रीया करण्याबाबत अभियांत्रिकी विभागास आदेश दिले होते. त्या अनुषंगाने विभागाकडे अपूरे मनुष्यबळ उपलब्ध असतानाही अभियांत्रिकी विभागाने उपकरणे खरेदीबाबतची प्रक्रीया केली आहे. सदरील कामाचे निविदा प्रक्रीया करतेवेळी निविदा प्रक्रीया करण्यास एकूण सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी गेल्याने निविदाधारकांनी निविदेसोबत जोडण्यात आलेल्या पाकीटातील कांही डी.डी.ंची मुदत संपली होती. त्यानुसार एकूण अपेक्षीत तिन निविदा प्राप्त झाल्यानंतर निविदा धारकांचे बंद पाकीटातील तांत्रिक निविदा उघडण्यात आले होते. सदर निविदा उघडण्यात आल्या असता कांही डी.डी.ची मुदत सहा महिन्यापेक्षा अधिक झाल्याने सदरची रक्कम वित्त व लेखा विभागात जमा झाली नाही.

एकूण सात शास्त्रीय उपकरण खरेदी कामाच्या नस्ती शास्त्रीय उपकरणे केंद्र विभागाकडे घेवून जाण्याबाबत वारंवार कळविण्यात येत होते. परंतु शास्त्रीय उपकरण केंद्राकडे नियमित कर्मचारी उपलब्ध नसल्याने त्यांनी त्या विभागात नियमीत कर्मचारी उपलब्ध झाल्यानंतर सदरील नस्ती त्या विभागात नेलेल्या आहेत. सदर डी.डी. च्या रकमेबाबत वित्त व लेखा विभागाने सदर प्रकरणाची वस्तुस्थिती मा.कुलगुरु महोदयांसमोर ठेवण्यासाठी सादर करण्याबाबत शास्त्रीय उपकरण केंद्र व अभियांत्रिकी विभाग यांना कळविले होते. त्यानुसार शास्त्रीय उपकरण केंद्राने सदर प्रक्रीयेची वस्तुस्थिती सादर केली असून अभियांत्रिकी विभागाने वस्तुस्थिती मा. कुलगुरुमहोदयांना सादर केली असता सदर विषय व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्याचे आदेश मा.कुलगुरुमहोदयांनी दिलेले असल्यामुळे सदर विषय व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: शास्त्रीय उपकरण केंद्रातील विविध उपकरणे खरेदीचे वेळी संबंधित फर्मकडून मागविण्यात आलेल्या टेंडर फॉर्म शुल्काच्या रकमेचे धनाकर्ष परत पाठवून ही रक्कम नव्याने भरण्याबाबत कळविण्यात यावे असे ठरले.**

**[ ०९ ] सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत घेण्यात येणाऱ्या पदवीस्तरावरील परीक्षेत (बी. ए. भाग- १, २, ३ एकत्रित गुणासह) भूगोल विषयात गुणानुक्रमे सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दवर्षी "प्राचार्य के. एम. जमादार" या नावने सुवर्ण पदक देण्याकरिता सोलापूर भूगोल शिक्षकसंघ, सोलापूर यांनी रु.१,००,०००/- देणगी दाखल सादर केलेल्या सादर पत्राबाबत व सुवर्णपदक नियमावलीमध्ये सदरची बाब समाविष्ठ करणेबाबत विचारार्थ.**

(टिपणी: दि.१६ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या पत्रान्वये, सोलापूर भूगोल शिक्षकसंघ, सोलापूर यांनी सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत घेण्यात येणाऱ्या पदवीस्तरावरील परीक्षेत (बी. ए. भाग- १, २, ३ एकत्रित गुणासह) भूगोल विषयात गुणानुक्रमे सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दरवर्षी **"प्राचार्य के. एम. जमादार सुवर्ण पदक"** या नावाने विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभावेळी स्नातकास प्रदान करण्यात यावे. याकरिता सोलापूर भूगोल शिक्षकसंघ, सोलापूर यांनी रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख रु. फक्त) देणगीदाखल देवू इच्छितात. सदर रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी सदरचे सुवर्णपदक पुढील वर्षापासून देण्यात यावे. तसेच सदर सुवर्णपदकासाठी विद्यापीठाने योग्य ती नियमावली करण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे नमूद केलेले आहे.

सोलापूर भूगोल शिक्षकसंघ, सोलापूर यांनी देवू केलेली देणगी स्विकारण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (ज) नुसार विचारार्थ.

**ठराव: सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत घेण्यात येणाऱ्या पदवीस्तरावरील परीक्षेत (बी. ए. भाग- १, २, ३ एकत्रित गुणासह) भूगोल विषयात गुणानुक्रमे सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दरवर्षी "प्राचार्य के. एम. जमादार सुवर्ण पदक" या नावाने सोलापूर भूगोल शिक्षकसंघ, सोलापूर यांच्यावतीने रु.१,००,०००/- देणगी स्विकारण्यात येवून सुवर्णपदक नियमावलीमध्ये सदरची बाब समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] दि.३०/०७/२०१३ रोजीच्या झालेल्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीची शिफारस परिनियम क्र.३२४ अन्वये मान्यतेस्तव.**

(टिपणी: दि.३०/०७/२०१३ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statute No. S.324 नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता त्यास दिनांक ०६/०८/२०१३ च्या वित्त व लेखा समितीने विषय क्र.२ ते ४ ला मान्यतेची शिफारस केली आहे. तसेच विषय क्र. ५ बाबत माहिती घेवून कार्यवाही करण्याची शिफारस केली आहे.

सबब, दि.३०/०७/२०१३ रोजीच्या झालेल्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीची शिफारस परिनियम क्र.३२४ अन्वये मान्यतेस्तव).

**ठराव: दि.३०/०७/२०१३ रोजीच्या झालेल्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.**

| | |
|---|---|
| **ख. स. ठराव क्र. ०१ :** | **दि.२३/०५/२०१३ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताची नोंद घेण्यात आली.** |
| **ख. स. ठराव क्र. ०२ :** | **अ) सोलापूर विद्यापीठातर्फे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ, पश्चिम विभागीय व क्रीडा महोत्सव स्तरावरील स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना व मार्गदर्शक संघव्यवस्थापकांना ट्रॅकसूट व क्रीडा किटस् देण्याबाबत तौलोनिक तक्त्यातील अ.क्र. १ चे दर मे. स्ट्रलिंग स्पोर्टस, बेळगाव व मे. देव स्पोर्टस, लातूर यांनी समान दिल्यामुळे मा. क्रीडा समन्वयक यांच्या शिफारशीनुसार अ.क्र. १ चे काम मे. स्ट्रलिंग स्पोर्टस, बेळगाव यांना देण्याची शिफारस वित्त व लेखा समितीने स्विकारुन मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**<br>**ब) सोबतच्या तौलोनिक तक्त्यातील अ.क्र. २, व ४ ते ९ करिता L1 असणारे मे. स्ट्रलिंग स्पोर्टस, बेळगाव, अ.क्र. ३ व १० करिता L1 असणारे मे. देव स्पोर्टस, लातूर यांच्याकडून खरेदी करण्यात यावेत. तथापि, L1 प्रमाणे फर्मने ट्रॅकसूट व क्रीडा किटस् पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यास अथवा पुरवठा न केल्यास प्रशासकीय मान्यतेअंती L2, L3 यांना पुरवठा आदेश देवून खरेदी करण्याची शिफारस वित्त व लेखा समितीने स्विकारुन मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.** |

| | |
|---|---|
| ख. स. ठराव क्र. ०३ : | अ) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता विद्यापीठातील सर्व संकुलातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दैनंदिन प्रात्यक्षिकेसाठी आवश्यक असणारी रसायने व काचेची उपकरणे खरेदीसाठी वार्षिक दरकरार करण्याकरिता तौलोनिक तक्त्यातील अ.क्र. २ साठी मे. श्री. साई केमिकल्स, सोलापूर व मे. श्री. यश ट्रेडर्स, सोलापूर यांचे दर समान असून मे. श्री. साई केमिकल्स, सोलापूर यांची मागील सेवा पाहता त्यांच्याकडून खरेदी करण्याची शिफारस वित्त व लेखा समितीने स्विकारुन मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.<br>ब) सोबतच्या तौलोनिक तक्त्यातील अ.क्र. २ वगळता इतर साहित्यासाठी जास्तीत जास्त सूट देणाऱ्या L1 फर्मसोबत दर करार करण्यात यावा. तथापि L1 फर्मने पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यास अथवा पुरवठा न केल्यास प्रशासकीय मान्यतेअंती L2 फर्मकडून साहित्यांची खरेदी करण्याची शिफारस वित्त व लेखा समितीने स्विकारुन मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. |
| ख. स. ठराव क्र. ०४ : | पश्चिम विभागीय व राष्ट्रीयस्तरीय युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या कलाकारांना तसेच विद्यार्थी संसद सदस्यांना व युवा महोत्सवाच्या सदस्यांना देण्यात येणाऱ्या ब्लेजर खरेदीची शिफारस वित्त व लेखा समितीने स्विकारुन मान्यता देण्यात आली. त्यास व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम १४ (७) नुसार मान्यता दिली. |
| ख. स. ठराव क्र. ०५ : | सोलापूर विद्यापीठाच्या कार्यालयीन वापराकरिता वाहन मे. डी. एस. के. मोटार्स, सोलापूर यांच्याकडून रु.२७,६१,१८३/- अधिक आवश्यकतेप्रमाणे ॲक्सेसरीज खर्च अंदाजे रु.३५,०००/- पर्यंत असा एकूण रु.२७,९६,१८३/- इतक्या रकमेस वाहन खरेदीची तसेच बुकींगसाठी रु.१ लाख अग्रीम देण्याची शिफारशीबाबत श्री. सतिश तडकसे यांनी सूचित केल्याप्रमाणे कार्यालयीन वापराकरिता वाहन खरेदी विषयी इतर विद्यापीठाकडून माहिती घेवून व शासन निर्णय तपासून कार्यवाही करण्याच्या शिफारशीनुसार महाराष्ट्रातील पुणे, औरंगाबाद, नांदेड, कोल्हापूर येथील अकृषि विद्यापीठे यांनी वाहन खरेदी केलेले असल्याने Toyoto Fortuner हे वाहन खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. |

दि. १०/०६/२०१३

क्रीडा विभाग
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
साहीत्याच्या खरेदीच्या दराचा तौलनिक तक्ता
निविदा प्राप्त होण्याची अंतिम तारीख १०/०६/२०१३

| अ.क्र. | तपशिल | नग | वंडरवर्ल्ड स्पोर्टस, सोलापूर | | देव स्पोर्टस, लातूर | | स्टर्लिंग स्पोर्टस, बेळगाव | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दरपत्रकातील दर | शेरा | दरपत्रकातील दर | शेरा | दरपत्रकातील दर | शेरा |
| 1 | ट्रॅकसूट सर्व खेळाडू, प्रशिक्षक व संघ व्यवस्थापकासाठी (छपाई सहीत) | ५५०नग | 650/- | L2 | 360/- | L1 | 360/- | L1 |
| 2 | टि-शर्ट प्रशिक्षक व संघ व्यवस्थापकासाठी (छपाई सहीत) | ५०नग | 200/- | L3 | 175/- | L2 | 125/- | L1 |
| 3 | टि-शर्ट आणि गेम पॅन्ट (छपाई सहीत) | ५५०नग | 325/- | L3 | 175/- | L1 | 180/- | L2 |
| 4 | क्रिकेट टि-शर्ट आणि गेम पॅन्ट (छपाई सहीत) | १८नग | 350/- | L3 | 320/- | L2 | 295/- | L1 |
| 5 | कुस्ती कॉस्युम (छपाई सहीत) | २०नग | 500/- | L3 | 250/- | L2 | 220/- | L1 |
| 6 | जलतरण मुले कॉस्युम(छपाई सहीत) | १५नग | 175/- | L3 | 125/- | L2 | 120/- | L1 |
| 7 | बेस्ट- फिजीक बनियन व गेम पॅन्ट (छपाई सहीत) | १५नग | 350/- | L3 | 125/- | L2 | 115/- | L1 |
| 8 | वेटलिफ्टींग कॉस्युम (छपाई सहीत) | १५नग | 200/- | L3 | 150/- | L2 | 115/- | L1 |
| 9 | पॉवर लिफ्टींग कॉस्युम (छपाई सहीत) | १५नग | 225/- | L3 | 150/- | L2 | 115/- | L1 |
| 10 | कबड्डी ड्रेस मुले/ मुली (छपाई सहीत) | ३२नग | 375/- | L3 | 200/- | L1 | 225/- | L2 |

१.) उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता मं. देव स्पोर्टस, लातूर व मं. स्टर्लिंग स्पोर्टस, बेळगाव यांनी अ.क्र. १ चे दर समान दिल्यामुळे मा. क्रीडा समन्वयक यांनी केलेल्या शिफारशीनुसार अ.क्र. १ चे काम स्टर्लिंग स्पोर्टस, बेळगाव यांना देण्यात यावे. २.) अ.क्र. ३, १० चे दर मं. देव स्पोर्टस, लातूर यांनी न्युनतम दिल्यामुळे सदरचे काम त्यांना देण्यात यावे. ३.) अ. क्र. २ व ४ ते ९ चे दर मे. स्टर्लिंग स्पोर्टस, बेळगाव यांनी न्युनतम दिल्यामुळे सदरचे काम त्यांना देण्यात यावे. उपरोक्त प्रमाणे शिफारस करण्यात आली.

क्रीडा समन्वयक | खरेदी समिती सदस्य | प्र.कुलसचिव | परिक्षा नियंत्रक | वित्त व लेखाधिकारी | मा.कुलगुरू

# SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR

Comparative chart for Rate Contract of Chemicals and Glasswares for the year 2013-14.

| S.N. | Name of Manufacturers | Shree Sai Chemicals, Solapur | | Prachi Enterprises, Pune | | Dodal Enterprises, Pune | | Shri Yash Traders, Solapur | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A) Chemicals | | Discount quoted in the Tender | | Discount quoted in the Tender | | Discount quoted in the Tender | | Discount quoted in the Tender | |
| 01] | Across | --- | | --- | | 05% | L-1 | 05% | L-1 |
| 02] | Aldrich | CD Price | L-1 | --- | | --- | | CD Price | L-1 |
| 03] | Lancaster (Alfa Aesar) | --- | | CD Price | L-1 | --- | | --- | |
| 04] | Thomas Baker | 32% | L-1 | --- | | --- | | 31% | L-2 |
| 05] | Qualigens | 30% | L-2 | --- | | 30% | L-2 | 31% | L-1 |
| 06] | Ranbaxy | 30% | L-2 | --- | | 30% | L-2 | 32% | L-1 |
| 07] | S.D. Fine | 30% | L-2 | --- | | --- | | 31% | L-1 |
| 08] | Spectro Chem | 26% | L-1 | --- | | --- | | 20% | L-2 |
| 09] | Euro Isotope | 05% | L-1 | --- | | --- | | --- | |
| 10] | Merck | 28% | L-2 | --- | | --- | | 32% | L-1 |
| 11] | Whatman | 26% | L-2 | --- | | 25% | L-3 | 30% | L-1 |
| 12] | Molychem | 32% | L-1 | --- | | 30% | L-2 | 21% | L-3 |
| B) Glasswares | | | | | | | | | |
| 1] | Agarwal | 32% | L-1 | --- | --- | 30% | L-3 | 31% | L-2 |
| 2] | J-Sil | 32% | L-1 | --- | --- | 25% | L-3 | 31% | L-2 |
| 3] | Duran ( RiviraGlass) | 22% | L-1 | --- | --- | --- | | --- | --- |
| 4] | Borosil | 18% | L-2 | --- | --- | 20% | L-1 | 10% | L-3 |
| 5] | Rivira Glass Pvt.Ltd. ( Duran) German | 22% | L-1 | --- | --- | --- | --- | --- | --- |

**Note :- VAT and LBT Extra if applicable.**

P.C.Member    P.C.Member    Ag. F.& A.O. 08-7-13    Ag.Registrar

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
विद्यार्थी कल्याण विभाग

दि.०८/०७/२०१३.

ब्लेजर तयार करण्याच्या दराचा तौलनिक तक्ता

| तपशील | नग | मे सी आर चव्हाण, सोलापूर | | शेरा | विरणप्पा गुमडेल , सोलापूर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कापडाचा तपशिल | दरपत्रकातील दर ब्लेजर प्रति नग | | कापडाचा तपशिल | दरपत्रकातील दर ब्लेजर प्रति नग | |
| ब्लेजर (कोट-रेमंड कंपनीचे कापडासह) शिलाई करून देणे व विद्यापीठाच्या बोधचिन्हा सहीत | ७५ | रेमंड ट्रोवीन सुटींग | १६५०/- | L1 | | | L2 |
| | | रेमंड सुपर ट्रोवीन मेटी | १७००/- | | रेमंड सुपर ट्रोवीन मेटी | १८५०/- | |
| | | रेमंड सफायर सुटींग | २१७५/- | | रेमंड स्टलींग ३१३८ | १९५०/- | |
| | | | | | रेमंड स्टलींग ६४३ | २०५१/- | |

उपरोक्त तौलनिक तक्ता विचारात घेता ब्लेजर खरेदी करण्यासाठी दि.१४/०५/२०१३ रोजी स्थानीक वृत्तपत्रातून जाहीर निविदा एकविस दिवसासाठी देण्यात आली होती . या मुदतीत ड़ी निविदा प्राप्त न झाल्याने दि.०७/०६/२०१३, दि. १५/०६/२०१३ व २४/०६/२०१३ अशी तीन वेळा अल्पमुदतवाढ देण्यात आल्या. त्यास अनुसरुन एकूण ४२ दिवसांच्या कालावधीत फक्त दोन दा प्राप्त झाल्या.

आणखी निविदा येणे अशक्य वाटल्याने दि. ०४ /०७/२०१३ रोजी दोनही निविदा उघडण्यास मा.कुलगुरु महोदय यांची मान्यता घेऊन दि. ०८/०७/२०१३ रोजी दोन्ही निविदा उघडण्यात या आहेत. Deligation of Power नुसार दोनच निविदा प्राप्त झाल्याने त्यापैकी कमीतकमी दराच्या निविदेचा खरेदीसाठी विचार करता, याचे अधिकार मा.कुलगुरु महोदय यांना आहेत.

सबब दोन पैकी L- I , न्युनतम दर असलेले मे. सी.आर. चव्हाण, सोलापूर यांच्याकडून रेमंड सुपर ट्रोवीन मेटी कापडाचे ब्लेजर प्रति नग रु. १७००/- प्रमाणे तयार करुन घेण्यासाठी रस करण्यात येत आहे.

खरेदीसमिती सदस्य | प्र वित्त व लेखा अधिकारी 08-7-13 | परिक्षा नियंत्रक | संचालक, तथा कुलसचिव म.वि.वि.म

मान्य
मा.कुलगुरू

- 38 -E:\NGL\DSW\UNI YOUTH FESTIVAL\nigcotion chart.doc

विषय क्रमांक ( १३ )
दिनांक 26 JUN 2013

[१३] सोलापूर विद्यापीठाच्या वापराकरीता Toyota Fortuner वाहन खरेदी करण्याबाबत तसेच टाटा इंडिगो या वाहनाची विक्री केल्यानंतर त्याच्या बदल्यात एक नवीन वाहन खरेदी करण्याबाबत.

(टिपणी: सोलापूर विद्यापीठ कार्यालयाकडे वापराकरीता सद्यस्थितीत हुंडाई वेरणा हे वाहन असून दि.२१/१०/२००८ रोजी खरेदी करण्यात आलेले आहे. वाहनाचे सद्यस्थितीत दि.३१/५/२०१३ अखेर कि.मी १८०२८२ इतके झालेले आहे.

कार्यालयीन कामाकरीता पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी वारंवार जाण्याकरीता विद्यापीठ वाहनाचा वापर करावा लागतो. सद्यस्थितीत असलेल्या वाहनाचे कि.मी.१५०००० पेक्षा जास्त झाले असून वाहनाचा पिक अप (वेग क्षमता) कमी झाला आहे. वाहनाची बैठक उंची व वाहनाची उंची कमी असून सिट स्पेस देखील कमी असल्यामुळे लांबच्या प्रवासावेळी वाहनात सतत ७ /८ तास बसावे लागते. त्यामुळे सद्यस्थितीत असलेले वाहन वारंवार दूरच्या प्रवासासाठी वापरणे सोईचे व आरामदायी नाही. विद्यापीठ वापराकरीता दूरच्या प्रवासाकरिता वाहनाची बैठक व्यवस्था आरामदायी असणारे Toyota Fortuner या वाहनाची डॉ.बा.आं.म.वि., औरंगाबाद यांनी खरेदी केली असून याचा विचार करता सोलापूर विद्यापीठास Toyota Fortuner हे वाहन खरेदी करणे संयुक्तिक होईल असे सुचविले आहे. तरी सदर वाहन खरेदी करण्यास अंदाजे रु.२५ लक्ष अधिक टॅक्स, आर टी ओ फी, इन्शोरन्स चार्जेस व इतर इतका खर्च येणार आहे. तसेच टाटा इंडिगो एम. एच. १३ ए. सी. ५३५ हे वाहन विक्री केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाकरिता त्याच्या बदल्यात एक नवीन वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. याकरिता अंदाजे रु.१० लक्ष अधिक टॅक्स, आर टी ओ फी, इन्शोरन्स चार्जेस व इतर इतका खर्च येणार आहे. असा एकूण अंदाजे रु.४० लक्ष इतका दोन नवीन वाहन खरेदी करण्यास येणार आहे.

सबब, Toyota Fortuner हे नवीन वाहन खरेदी करण्यास व टाटा इंडिगो एम. एच. १३ ए. सी. ५३५ हे वाहन विक्री केल्यानंतर त्याच्या बदल्यात एक नवीन वाहन खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यतेस्तव विचारार्थ).

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

सोलापूर विद्यापीठाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता ०२ नवीन वाहने खरेदी करण्यास व यासाठी अपेक्षित खर्च रु.४० लक्ष अधिक टॅक्स, आर. टी. ओ. Registration फीज, इन्शोरन्स चार्जेस व इतर अनुषंगिक खर्च यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

व्यवस्थापन परिषदेची ५२ वी सभा बुधवार, दि.२६ जून, २०१३ कार्यवृत्तांत १३/४५

DSK TOYOTA
DSK MOTORS LTD.
Gat No. 15/4-B, '3S Facility' At. Post Kegaon,
Pune -Solapur N. H. 9, Solapur - 413 255
Phone : 0217 - 6611100, Fax : 0217 - 6611122
E-mail : sales@dsktoyota.com

2264

Date : 03/07/2013

PROFORMA INVOICE

| | |
|---|---|
| To, The Registrar, Solapur University Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur - 413255. Details | Sales Officer : Rishikesh. Contact No.: 8308813049. E-mail : |
| | Model : Fortuner 4x2MT. Colour : White Pearl Mica. Suffix : FC |
| Ex-Showroom Price | 21,92,065=00 |
| Octroi / LBT | 33,451=00 |
| RTO (Company/Individual/Tourist) | 4,46,303=00 |
| Insurance | 83,139=00 |
| Other Misc. Charges | 6,225=00 |
| Accessories | — |
| On Road Price | 27,61,183=00 |
| | |
| | |
| | |
| Net on Road Cost | 27,61,183=00 |

Terms & Conditions:

1. Booking amount for Innova Rs. 50,000/-, Corolla Rs. 50,000/-, Fortuner Rs. 1,00,000/- and Prado Rs. 5,00,000/- (Non Refundable ), Etios & Liva Rs. 50,000/-
2. Mode of payment: By DD/Pay order in favour of "DSK MOTORS LIMITED", payable at Solapur.
3. Prices rulling at the time of delivery will be only applicable.
4. Changes in price at the discretion of Toyota Kirloskar Motors Pvt. Ltd., Bangalore.
5. Our rest of the terms & conditions will be the same as mentioned in our Booking form.
6. Prices are inclusive of CMVR Item Kit. (Head Lamp Bulp, Warning Triangle, First Aid Kit).
7. RTO Tax inclusive of Service Charges.
8. Above prices are inclusive of sales tax wherever applicable.
9. Prices subject to change without notice if there is a change in Govt. taxes like Octroi, RTO etc.
10. All disputes are subject to Pune Jurisdiction only.
11. This proforma is valid for 7 days from the date of issue.
12. Accessories cost inclusive of labour & taxes.

Solapur University Solapur
Quotation Opened

For DSK Motors Ltd.

Dir-BCUD C.O.E. F & A.O. Registrar

Authorised Signatory

P.C. Member P.C. Member P.C. member

QMS/ACC/7.5.5R/WO/18 rev01 date: 10.10.2012

DSK MOTORS LTD.,SOLAPUR

TAG N

**FORTUNUER BMC - WORK ORDER ( GENUINE ACCESSORIES )**

Customer Name :- The Registrar Solapur Univ — Date :- 3/07/2013

Model / Suffix / Colour :- - Safy — S. O. Name :- Rishikesh

Chassis No. :- — D. Date&Time :-

Engine No. :- — Place :-

(A) 9422020945 - Girish Kulkarni

| Sr.no | PART NO. | PART NAME | Total (Rs.) | STOCK |
|---|---|---|---|---|
| 1 | PZ0000K619 | RUBBER FLOOR MAT | 1,868 | |
| 2 | PZ0000K617 | FLOOR MAT FABRIC | / 4,002 | |
| 3 | PZ0050K607 | TRUNK MAT FABRIC | 1,260 | |
| 4 | PZ0020K603 | TRUNK ORGANIZER | 1,432 | |
| 5 | PZ0450K606 | CAR COVER | 3,809 | |
| 6 | PZ0160K603 | FRONT SUNSHADE | 355 | |
| 7 | PZ0100K621 | CAR CUSSION 1 Pc | 450 | |
| 8 | PZ0330K601 | VANITY SUN VISOR | 619 | |
| 9 | PZ0490K015 | SCOOP COVER | 1,860 | |
| 10 | PZ0630K001 | AUTO FOLDING MIROR | 4,327 | |
| 11 | PZ0580K007-09 | FR FENDER MIRROR BLACK | 5,800 | |
| 12 | PZ0580K007-40 | FR FENDER MIRROR WHITE | 5,800 | |
| 15 | PZ0420K038 | CHROM DOOR HOSING | 5,868 | |
| 16 | PZ0330K009 | SIDE VISOR | 4,935 | |
| 17 | PZ0470K00500 | BODY CLIDING PRIMER | 23,295 | |
| 18 | PZ0500K015 | REAR BUMPER STEP GUARD | 3,890 | |
| 19 | PZ0560K010 | MUFFLER CUTTER | 1,260 | |
| 20 | PZ0020K005 | LUGGAGE TRAY | 2,025 | |
| [illegible] | PZ0030K002 | CARGO NET | 2,250 | |
| 22 | PZ0640K602 | LEGROOM LAMP BLUE | 5,696 | |
| 23 | PZ0640K603 | LEGROOM LAMP AMBER | 5,696 | |
| 24 | PZ0240K025 | ILLUMINATED SCUFF PLATE | 10,740 | |
| 25 | PZ0340K002 | ROOF RACK | 17,831 | |
| 26 | PZ0340K003 | ROOF CARRIER | 32,790 | |
| 27 | | TGA Coating | 8,870 | |
| | | | | |
| | Solapur University Solapur Quotation Opened | | | |
| | | TOTAL | | |

Dir-BCUD C.O.E. F & A.O. Registrar

P.C. member P.C. member P.C. member

DSK MOTORS LTD. SOLAPUR

**[ ११ ] सोलापूर विद्यापीठातर्फे आखिल भारतीय आंतरविद्यापीठ, पश्चिम विभागीय व क्रीडा महोत्सव स्तरावरील स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना व मार्गदर्शक संघव्यवस्थापकांना ट्रॅकसूट व क्रीडा किटस् देण्यासाठी खरेदी करण्याबाबत.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठामार्फत अखिल भारतीय आंतरविद्यापीठ, पश्चिम विभागीय व क्रीडा महोत्सव स्तरावरील स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूंना व मार्गदर्शक संघव्यवस्थपकांना ट्रॅकसूट व क्रीडा किटस् देण्यासाठी. दैनिक पुढारी या वृत्तमानपत्रच्या दि.२२/०५/२०१३ रोजीच्या आंकामधून व विद्यापीठाच्या संकेत स्थळावर दि. २१/०५/२०१३ ते १०/०६/२०१३ या कालावधीमध्ये जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या.त्यास अनुसरून तिन फर्मने निविदा सादर केल्या. सदर निविदा दि.१०/०६/२०१३ रोजी स्थानिक खरेदी समिती सदस्यासमवेत व निविदाधारकांच्या उपस्थित उघडण्यात आल्या व तुलनात्मक तक्ता करण्यात आला. त्याप्रमाणे सर्वात कमी दर असलेल्या निविदा धारकारकाना सदर कामाची निविदा मिळाल्याचे सागण्यात आले. तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे.

सबब, सोलापूर विद्यापीठातर्फे आखिल भारतीय आंतरविद्यापीठ, पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ व क्रीडा महोत्सव स्तरावरील स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूंना व मार्गदर्शक संघव्यवस्थापकांना ट्रॅकसूट व क्रीडा किटस् देण्यासाठी खरेदी करण्याबाबत विचारार्थ).

ठरावः **सोलापूर विद्यापीठातर्फे आखिल भारतीय आंतरविद्यापीठ, पश्चिम विभागीय व क्रीडा महोत्सव स्तरावरील स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना व मार्गदर्शक संघव्यवस्थापकांना ट्रॅकसूट व क्रीडा किटस् खरेदी करण्याबाबतचा विषय क्र.१० अन्वये खरेदी समिती व वित्त व लेखा समितीच्या कार्यवृत्तांतासमवेत मान्यता देण्यात आली आहे.**

**[ १२ ] सोलापूर विद्यापीठातील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क माफ करणेबाबत स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडिया, सोलापूर जिल्हा कमिटी यांचेकडून प्राप्त झालेले निवेदन व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः उपरोक्त विषयास अनुसरुन स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडिया, सोलापूर जिल्हा कमिटी यांनी सोलापूर विद्यापीठ वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क माफ करावे असे निवेदन दिले आहे. सदरील निवेदनाची छायांकीत प्रत यासोबत अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

सदर निवेदनात नमूद केले आहे की, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश फी व मेस शुल्क माफ करण्यात आले असून सोलापूर जिल्ह्यात दुष्काळ असल्यामुळे त्याच धर्तीवर सोलापूर विद्यापीठातील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क माफ करावे अशी मागणी केली आहे. या संदर्भात कुलसचिव, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या नावे जा.क्र.सोविसो/अभि.विभाग/२०१३-१४/३२२१, दि.०२/०८/२०१३ अन्वये पत्र पाठवून वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे शुल्कमाफी संदर्भातील निर्णयाची प्रत पाठवणेबाबत पत्र पाठविण्यात आले आहे. परंतु सदरील माहिती अद्याप अप्राप्त आहे.

उपरोक्त विषय व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्याचे आदेश मा.कुलगुरुमहोदयांनी दिलेले असल्यामुळे सदर विषय पूढील कार्यवाहीस्तव व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ).

**ठरावः सदरचा विषय अमान्य करण्यात आला.**

**[ १३ ]** **विद्यापीठ प्रांगणातील मुलींचे वसतिगृह व मुलांचे वसतिगृह याकरिता २ गृहपाल (Warden) पदे निर्माण करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ प्रांगणात मुलींचे वसतिगृह डिसेंबर, २००९ पासून व मुलांचे वसतिगृह जुलै, २०११ पासून कार्यन्वित झालेले आहे. २०१३-१४ शैक्षणिक वर्षामध्ये मुलींच्या वसतिगृहात १२५ विद्यार्थिनी आहेत व मुलांच्या वसतिगृहात २१० विद्यार्थी आहेत. या दोन्ही वसतिगृहासाठी समन्वयक म्हणून दि.२९/०८/२००९ पासून डॉ. ए. ए. घनवट, सहायक प्राध्यापक, रसायनशास्त्र संकुल हे काम पहात आहेत. तसेच श्री. एस. एन. शृंगारे, सहायक प्राध्याक, रसायशास्त्र संकुल हे दरमहा रु.२०००/- मानधनावर मुलांच्या वसतिगृहासाठी रेक्टर म्हणून कार्यरत आहेत. मुलींच्या वसतिगृहासाठी यापूर्वी कंत्राटी महिला शिक्षकामधून रेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती.

सदरचे समन्वयक व रेक्टर हे पूर्णवेळ शिक्षक आहेत. तथापि, मुलींच्या व मुलांच्या वसतिगृहाकरिता स्वतंत्रपणे पूर्णवेळ समन्वयक / रेक्टर असणे अत्यंत गरजेचे आहे. सदरची पदे विद्यापीठाच्या आस्थापनेवर शासनमान्य पदांमध्ये समाविष्ठ नाहीत. मुलींच्या व मुलांच्या वसतिगृहासाठी पूर्णवेळ स्वतंत्र गृहपाल नेमणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने दोन गृहपाल पदे विद्यापीठ आस्थापनेवर निर्माण करावी लागणार आहेत.

सबब, विद्यापीठ प्रांगणात मुलींचे वसतिगृह व मुलांचे वसतिगृह याकरिता २ गृहपाल (Warden) पदे निर्माण करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** **विद्यापीठ प्रांगणातील मुलींचे वसतिगृह व मुलांचे वसतिगृह याकरिता प्रत्येकी १ याप्रमाणे २ गृहपाल (Warden) पदे विद्यापीठ फंडातून निर्माण करण्यास व सदर पदे ₹८,०००/- एकत्रित वेतनावर भरण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १४ ] विद्यापीठ संकुलाकडील पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच ज्या महाविद्यालयात संकुलाकडील अभ्यासक्रम शिकविला जातो त्या अभ्यासक्रमासाठी लागू केलेल्या क्रेडिट पध्दती मधील ०.९१ दंडकात केलेल्या सुधारणेबाबत मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता देऊन केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ संकुलाकडील पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच ज्या महाविद्यालयात संकुलाकडील अभ्यासक्रम शिकविला जातो त्या अभ्यासक्रमासाठी लागू केलेल्या क्रेडिट पध्दती मधील ०.९१ सुधारीत दंडक खालीलप्रमाणे:

"FGPA May be increased by maximum 0.4 grade points under Ordinance O.91, Further the total marks obtained by a candidate will also be increased at 1 mark per 0.04 increase in grade point i.e. maximum 10 marks, the increase shall be up to next nearest integer"

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५४(१) नुसार, अध्यादेशामध्ये सुधारणा केल्याच्या बाबीस मा. कुलगुरुमहोदयांनी म.वि.का. १९९४ कलम १४(७) अन्वये, व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

सबब, मा. कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठराव: मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १५ ] पश्चिम विभागीय व राष्ट्रीयस्तरीय युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या कलाकारांना तसेच विद्यार्थी संसद सदस्यांना व युवा महोत्सव समितीच्या सदस्यांना देण्यात येणारे ७५ नग ब्लेजर खरेदी करण्याबाबत मा. कुलगुरु महोदय यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: पश्चिम विभागीय व राष्ट्रीयस्तरीय युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या कलाकारांना तसेच विद्यार्थी संसद सदस्यांना व युवा महोत्सव समितीच्या सदस्यांना देण्यात येणारे ७५ नग ब्लेजर खरेदी करण्यासाठी उपरोक्त तौलनिक तक्ता विचारात घेता ब्लेजर खरेदी करण्यासाठी दि.१४/०५/२०१३ रोजी स्थानिक वृत्तपत्रातून जाहीर निविदा एकविस दिवसासाठी देण्यात आली होती. या मुदतीत एकही निविदा प्राप्त न झाल्याने दि.०७/०६/२०१३, दि.१५/०६/२०१३ व दि.२४/०६/२०१३ अशी तीन वेळा अल्पमुदतवाढ देण्यात आल्या. त्यास अनुसरुन एकूण ४२ दिवसांच्या कालावधीत फक्त दोन निविदा प्राप्त झाल्या. आणखी निविदा येणे अशक्य वाटल्याने दि.०४/०७/२०१३ रोजी दोनही निविदा उघडण्यास मा. कुलगुरुमहोदयांची मान्यता घेऊन दि.०८/०७/२०१३ रोजी दोन्ही निविदा उघडण्यात आल्या. त्यानुसार दोन पैकी L-१, न्युनतम दर असलेले मे. सी. आर. चव्हण, सोलापूर यांच्याकडून रेमंड सुपर ट्रोवीन मेटी कापडाचे ब्लेजर प्रति नग रु.१,७००/- प्रमाणे तयार करुन घेण्यासाठी शिफारस करण्यात आली. शिफारशीनुसार सदरचा विषय वित्त व लेखा समितीच्या बैठकीत विषय व ठराव क्र.४ अन्वये मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आलेली आहे. नजिकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक होणार नसल्याने व युवा महोत्सवाच्या तारखा विचारात घेता महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम १४ (७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्यावतीने

मा. कुलगुरुमहोदयांनी वित्त व लेखा समितीच्या बैठकीतील ठराव क्र.४ यास व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

सबब, मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव: मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १६ ] पर्यावरणशास्त्र मराठी माध्यम व इंग्रजी माध्यम प्रत्येकी ५००० प्रती पुस्तक छपाईबाबत मा. कुलगुरुमहोदय यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: पर्यावरणशास्त्र मराठी माध्यम व इंग्रजी माध्यम अनुक्रमे ५००० प्रती पुस्तके छपाईसाठीची निविदा मागविण्याकरिता दै. सकाळ व दै. पुण्यनगरी मध्ये दि.१२/०६/२०१३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. या अनुषंगाने एकूण पाच फर्मकडून निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा दि.०८/०७/२०१३ रोजी निविदा धारक / फर्मचे प्रतिनिधी व निविदा उघडणे समिती सदस्यांच्या आधारे अपात्र झाल्या त्यामुळे उर्वरित पात्र तीन फर्मचे लिफाफा क्र.२ उघडण्यात आले व त्यानुसार तौलनिक तक्ता तयार करण्यात आला. सदर तौलनिक तक्त्यानुसार पर्यावरणशास्त्र मराठी माध्यम व इंग्रजी माध्यम पुस्तके लुशा ऑफसेट यांचेकडून छपाई करण्याची समितीने शिफारस केलेली आहे. नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची सभा नसल्यामुळे तसेच महाविद्यालयामध्ये प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे तातडीने छपाई करुन घेणे आवश्यक होते. त्यामुळे मा. कुलगुरुमहोदयांनी छपाई करुन घेण्यास व्यवस्थापन परिषदेच्यावतीने विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) नुसार दि.०३/०८/२०१३ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने प्रकाशन विभागामार्फत जा.क्र.सोविसो/विवलेखवि/२०७, दि.०८/०८/२०१३ अन्वये मे. लुशा ऑफसेट, सोलापूर यांना सदर पुस्तके छपाईसाठी पुरवठा आदेश दिलेला आहे.

सदर छपाईसाठी एकूण रक्कम रु.१,६२,५००/- इतका खर्च येणार आहे. सदरचा खर्च हा वित्त विभागकडील "Printing for Publication" या अंदाजपत्रकीय शिर्षकातून होणार आहे.

सबब, विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) नुसार मा. कुलगुरुमहोदयांनी उपरोक्तपणे केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठराव: मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १७ ] सोलापूर विद्यापीठास पात्र ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरविण्याचीबाबत मा. कुलगुरुमहोदय यांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम १४ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने घेतलेले निर्णय माहितीस्तव.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाकरिता ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरविण्याकरिता दि.२९/०५/२०१३ रोजी दै. पुण्यनगरी या वृत्तपत्रात व विद्यापीठ संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात आली. या अनुषंगाने एकूण ११ निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदापैकी मे. प्रायमा ग्रुप, सोलापूर यांची निविदा दि.२७/१२/२००७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र.११ नुसार मे. प्रायमा ग्रुप, सोलापूर यांना येथून पुढे कोणत्याही प्रकारचे कंत्राट देवू नये असे ठरले आहे. असा ठराव झाल्यामुळे उर्वरित १० निविदा दि.२०/०६/२१३ रोजी दु.४:०० वा. खरेदी समिती सदस्य व उपस्थित असलेल्या निविदाधारक यांच्यासमोर तांत्रिक निविदा लिफाफे उघडण्यात आल्या. तांत्रिक निविदामधील त्रृटीची पुर्तता करण्याबाबत संबंधित निविदाधाराकांना समितीने तोंडी सूचना दिली व त्यानुसार दि.२७/०६/२०१३ रोजी त्यांच्याकडील मुळ कागदपत्रे तपासून पात्र निविदाधारकांचे खरेदी समिती सदस्य व उपस्थित असलेल्या निविदाधारक यांच्यासमोर दरपत्रक उघडण्यात आले व त्यानुसार तौलनिक तक्ता तयार करण्यात आला. सदर तौलनिक तक्त्यानुसार सुरक्षा रक्षक मनुष्यबळ मे. ए. वन सेक्युरटी ॲन्ड मनुष्यबळ पुरवठा, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर यांचेकडून घेण्यास शिफारस केली. तसेच संगणक लेखनिक, वाहनचालक, शिपाई, प्रयोगशाळा परिचर, शिपाई व माळी या प्रकारचे मनुष्यबळ मे.आयडियल एंटरप्रायजेस, होटगी रोड, सोलापूर यांचे घेण्याची शिफारस केली. त्यास मा.कुलगुरुमहोदय यांनी नजिकच्या काळामध्ये व्यवस्थापन परिषदेची सभा नसल्यामुळे व दि.३०/०६/२०१३ रोजी मागील ठेकेदाराचा ठेका संपत असल्याने तौलनिक तक्त्यानुसार समितीने केलेल्या शिफारशीस महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने आस्थापना विभागामार्फत (१) जा.क्र. सोविसो/आस्था/२०१३-१४/२२९५ दि.२९/०६/२०१३. (२) जा.क्र. सोविसो/आस्था/२०१३-१४/२३२७ दि.२९/०६/२०१३ अन्वये मे. आयडियल एंटरप्रायजेस यांना व जा.क्र.सोविसो/आस्था/२०१३-१४/२२९६दि.२९/०६/२०१३ अन्वये मे. ए. वन सेक्युरटी ॲन्ड मनुष्यबळ पुरवठा यांना मुनष्यबळ पुरवठा आदेश दिलेला आहे.

सबब, सदरची बाब माहितीस्तव).

